# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - स्वर तरंग
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. रेणुका रविंद्र वाटवे

---

संगीत माझी अस्मिता, संगीत माझी प्रतिभा,
संगीतची मनःप्रभा, संगीताची मनी आभा !

संगीतची जिव्हाळा, संगीतची कनवाळा,
संगीताचा लळा आगळा,
भावतो दिन दयाळा, सकळा !

संगीत गुंजते रोमरोमी, संगीत रंगते अंतरंगी,
विलसते सप्तसुरांच्या कोंदणी,
झळाळते नादब्रम्ही !

संगीत उदरीच्या गाभारी,
प्रसवते “प्रणव “रूपी सुप्रभाती,
चैतन्यशक्ती ती अविनाशी,
झेप घेते अवकाशी !

प्रहर, भाषा, स्थळ असे कोणतेही,
संगीत जाणते,खोली सुख दुःखाची,
भाव ओले हृदयस्पर्शी,
मर्मबंधी नक्षी शब्दब्रह्माची !

संगीतची दिव्यशक्ती,
स्वर लहरींस नसे क्षिती,
मनःचक्षूंसी दिव्य ज्योती,
बदलते जीवन दैवगती !

Anant Music Therapy

# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

सुगम तयांचे गुण,
रूप, सगुण निर्गुण निराकार,
स्वर ताल लयीचा त्रिवेणी संगम,
सुखावतो, गायन, वादन,
नृत्यकलेत !

संवेदना कोमल तरल,
चरांचरांत ऊमटती तरंग,
स्पर्शती स्पंदने जिवा शिवांस,
अव्यक्त परी बोलके स्वरूप !

ॐकार रूपी बिजमंत्र,
गर्भसंस्कारी अग्रगण्य,
विश्वशांतिस ते कारण,
आहत,अनाहत, अजपाजप ऊच्चारण !

श्री वागेश्वरी मज पूजनीय, अनुभूती, अलौकीक विलोभनीय,
स्वरसंपदा नित्य चिंतनीय
"साधना"पुर्वजन्मीचेच सुकृत !

Anahat Music Therapy